# कुलगुरू तथा निवडणुक अपीलीय अधिकारी
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**(महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुका-२०२२)**
**(विविध अभ्यासमंडळांच्या अध्यक्षाच्या निवडणुका- कलम ४० महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ प्रमाणे**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींन्वये विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांकरीता एकरुप परिनियम क्र.१/२०१७ मधील तरतुदींप्रमाणे विविध प्राधिकरणांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू आहे. यापैकी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४० प्रमाणे विविध अभ्यासमंडळांच्या अध्यक्षाच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून त्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी दिनांक १३-०४-२०२३ रोजी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली असून सदर यादीच्या नाराजीने विहित मुदतीत या कार्यालयात अपील दाखल केले आहेत. सदर अपिलांसोबतच काही आक्षेपही प्राप्त झाले आहेत. या आक्षेपांबाबत आक्षेपदारास सुनावणीची पुरेशी संधी देऊन त्यांचे आक्षेप खालीलप्रमाणे निकाली काढण्यात आले आहेत.

| अ.क्र. | आक्षेपदाराचे नाव व अभ्यासमंडळ | निर्णय |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रशांत अर्जुनराव साबळे, इतिहास अभ्यासमंडळ | इतिहास अभ्यासमंडळात नामनिर्देशनपत्र वैध ठरलेल्या डॉ. जमाले हरी नारायण यांच्याबाबत डॉ. साबळे यांनी आक्षेप सादर केला आहे. डॉ. साबळे यांनी डॉ. जमाले यांच्याबाबतीत त्यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्याकरिता काही मुद्दे मांडले.<br>डॉ. जमाले हे २०१७ ते २०२२ या कालावधीत एसएनडीटी विद्यापीठातील इतिहास अभ्यासमंडळाचे चेअरमन म्हणून कार्य करत होते. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६५ नुसार अभ्यासमंडळाचा अध्यक्ष असलेला व्यक्ती हा लागोपाठ पुन्हा त्याच पदावर सलग (Consecutive Term) उमेदवार उभा राहू शकत नाही. करिता, डॉ. जमाले यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरवावा, अशी विनंती डॉ. साबळे यांनी केली आहे.<br>याबाबत सादर केलेला आक्षेप व अधिनियमातील तरतुदीचे मी बारकाईने अवलोकन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि एस.एन.डी.टी. विद्यापीठ हे दोन स्वतंत्र विद्यापीठ असून स्वायत्त आहेत. त्यामुळे एस.एन.डी.टी. विद्यापीठात पूर्वलगतच्या पदावधीमध्ये इतिहास अभ्यासमंडळाचे अध्यक्ष असलेले डॉ. जमाले हे या विद्यापीठ अधिनियमातील कलम ६५ नुसार ह्या विद्यापीठातील इतिहास अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदासाठी अपात्र ठरत असल्याबाबत आढळून येत नाही.<br>करिता, डॉ. साबळे यांचा आक्षेप मी फेटाळत असून निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव यांनी घेतलेला निर्णय मी कायम करीत आहे. |

दिनांक : १८.०४.२०२३
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद.

कुलगुरू तथा
निवडणुक अपीलीय अधिकारी